www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १२९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, २ ऑक्टोबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात

### ठरलं! विलास लांडे घड्याळाच्या हातानेचं तुतारी फुंकणार

पिंपरी : विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी शरद पवार गटात मोठे इन्कमिंग सुरु आहे. त्यातच आता विलास लांडे यांचे सुपुत्र विक्रांत लांडे यांनी मोठी घोषणा केली आहे. विलास लांडे विधानसभेला तुतारी फुंकणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटात असलेले माजी आमदार विलास लांडे यांनी नुकतीच शरद पवारांची भेट घेतली होती. त्यानंतर हातातील घड्याळ बाजूला करत ते तुतारी हातात घेतील अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली. मात्र मागील काही दिवसात अनेकदा विलास लांडे यांनी शरद पवारांची भेट घेतली आहे.

### महाविकास आघाडीत जागावाटपावरून नाराजीनाट्य; पवार अन् ठाकरे नाराज?

मुंबई : महाविकास आघाडीत जागावाटपावरून नागजीनाट्य रंगल्याचे चित्र आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठे यश मिळाल्याने आत्मविश्वास बळावला आहे. दरम्यान तिन्ही पक्षात जागावाटपावरून रस्सीखेच सुरु आहे. विदर्भातील ६२ जागांपैकी ४५ जागांवर काँग्रेसने दावा केल्याने शिवसेना ठाकरे पक्ष आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. विदर्भातून काँग्रेसकडे ६२ जागांसाठी ४०० हून अधिक इच्छुकांचे अर्ज आले आहेत. लोकसभा निवडणुकीत अमरावती, रामटेक या हक्काच्या जागा सोडल्याने विदर्भातील विधानसभेच्या जागा मिळाव्यात, असा आग्रह शिवसेना ठाकरे पक्षाने धरला आहे. तर वर्ध्याची जागा शरद पवार यांच्या 'राष्ट्रवादी'ने जिंकल्याने त्यांनीही १० ते १२ जागांवर दावा केला आहे. दसऱ्यापूर्वी जागावाटप पूर्ण करण्याचे महविकास आघाडीने निश्चित केले आहे.

### पेजरस्फोट हा इस्त्रायलचा मास्टरस्ट्रोक"- सैन्य प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी

नवी दिल्ली : इस्त्रायलने गेल्या महिन्यात लेबनानमधील हिजबुल्लाह संघटनेच्या दहशतवाद्यांना पेजरच्या माध्यमातून स्फोट घडवून ठार केले होते. अशा प्रकारचे स्फोट घडवणे हा इस्त्रायलचा मास्टरस्ट्रोक होता असे मत सैन्य प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी व्यक्त केले. नुकतेच लेबनॉनमध्ये पेजर आणि वॉकी-टॉकीजच्या स्फोटांमध्ये हिजबुल्लाहाचे ४० दहशतवादी ठार झाले होते. तर ३ हजारांहून अधिक जखमी झाले होते. याबाबत जनरल द्विवेदी म्हणाले की, तुम्ही लढायला सुरुवात कराल त्या दिवशी युद्ध सुरू होत नाही, तर जेव्हा तुम्ही नियोजन सुरू करता तेव्हा खर्या अर्थाने युद्ध सुरू झालेले असते. इस्रायलने आता आपले लष्करी लक्ष गाझा पट्टीवरून लेबनॉनच्या उत्तरेकडील सीमेवर हलवले आहे. तिथे त्यांनी हिजबुल्लाहला लक्ष्य केले आहे. इस्रायलने काहीतरी वेगळे केले आहे. इस्रायलने ठरवले होते की, हमास हे त्यांचे प्राथमिक लक्ष्य आहे. इस्रायलने प्रथम हमासचा खात्मा केला. यानंतर दुसऱ्या बाजूला हिजबुल्लाह या दहशतवादी संघटनेवर लक्ष केंद्रित केले. पेजर्ससाठी तयार केलेली शेल कंपनी एक मास्टरस्ट्रोक होता असेही द्विवेदी यांनी सांगितले.

### शाळेच्या वाटेवर भीषण अपघात; विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू

मुंबई : मुंबईतील गोरेगाव परिसरात एका दुर्दैवी घटनेत शाळेत जाणाऱ्या विद्यार्थिनीवर काळाने घाला घातला. मंगळवारी सकाळी फिल्मसिटी रोडवरील ओबेरॉय मॉलजवळ, डम्पर आणि बाईकच्या भीषण अपघातात एका शाळकरी मुलीचा जागीच मृत्यू झाला, तर तिचे वडील गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून हिट अँड रनच्या वाढत्या घटनांबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे.

## राजकोट किल्ल्यावरील दुर्घटनाप्रकरणी शिल्पकार जयदीप आपटे याचा जामीन अर्ज नामंजूर



● सावंतवाडी, विशाल पाटील :

मालवण राजकोट किल्ल्यावरील शिव पुतळा दुर्घटनाप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेला शिल्पकार जयदीप आपटे याचा न्यायालयाने जामीन अर्ज नामंजूर केला आहे. यापूर्वी बांधकाम सल्लागार डॉ. चेतन पाटील याचाही जामीन अर्ज नामंजूर केला होता. आपल्याला जामीन मिळावा यासाठी सिंधुदुर्ग येथील जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. यावर मंगळवारी सुनावणी होऊन हा अर्ज प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एच बी गायकवाड यांनी नामंजूर केला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारताना काळजी घेतली पाहिजे होती, ती काळजी घेतली नाही, असा सविस्तर युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. या कामी सरकारी अभियोक्ता गजानन तोडकरी आणि सहाय्यक सरकारी अभियोक्ता रुपेश देसाई यांनी काम पाहिले.

राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे नौसेना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले होते. पुतळा दि. २६ ऑगस्ट रोजी कोसळला. अवघ्या आठ महिन्यांत पुतळा कोसळल्याने शिवप्रेमींतून प्रचंड संताप व्यक्त करण्यात आला. या दरम्यान मालवण पोलीस ठाण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता यांनी पुतळा शिल्पकार जयदीप आपटे आणि बांधकाम सल्लागार डॉ. चेतन पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पान २ वर

## २०२९ मध्ये फक्त भाजप,' अमित शाह यांचं मोठं विधान

### अमित शाह यांनी मतभेद विसरुन काम करण्याचं कार्यकर्त्यांना केलं आवाहन

● मुंबई, यश सावंत :

लोकसभेत 2 जागा आल्या तेव्हा कुणीही पक्ष सोडून गेले नव्हते अशी आठवण सांगत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्र भाजप महायुतीचे सरकार स्थापन करेन असा शब्द देत असल्याचं विधान केलं आहे.



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मंगळवारी महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. अमित शाह यांचं महाराष्ट्रात भव्य स्वागत करण्यात आलं. अमित शाह यांनी मंगळवारी स्वामी नारायण इथल्या योगी सभागृहात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. यावेळी त्यांनी मतभेद विसरुन काम करण्याचं आवाहन केलं. तसंच २०२९ मध्ये एकट्या भाजपाच्या जीवावर सरकार बनवायचं आहे असं मोठं विधान अमित शाह यांनी केलं आ हे. २०२४ मध्ये युतीचे सरकार असेल, मात्र २०२९ मध्ये शुद्ध रुपानं कमळाचं सरकार आणायचं आहे असं अमित शाह म्हणाले आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या उपस्थितीत भाजपचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला. शक्ती कार्यकर्त्यांची - प्रचिती आत्मविश्वासाची टॅगलाईन खाली भाजपकडून मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं. यावेळी त्यांनी मुंबईतील पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केलं. मंगळवारपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर अमित शाह मुंबई, ठाणे आणि कोकण मतदारसंघाचा आढावा घेणार आहेत. लोकसभेत २ जागा आल्या तेव्हा कुणीही पक्ष सोडून गेले नव्हते अशी आठवण सांगत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्र भाजप महायुतीचे सरकार स्थापन करेन असा शब्द देत असल्याचं विधान केलं आहे. "निराशेला गाडून कामाला लागा. लोकसभेत २ जागा आल्या तेव्हा कुणीही पक्ष सोडून गेले नव्हते.

मी शब्द देतो महाराष्ट्र भाजप महायुतीचे सरकार स्थापन करेन," असा निर्धार अमित शाह यांनी व्यक्त केला आहे. "महाराष्ट्राची निवडणूक देशाची दशा आणि दिशा बदलणारी आहे.

## बदलापूर प्रकरणी शाळेच्या ट्रस्टींना झटका

● बदलापूर, आकाश कांबळे :



बदलापूर येथील दोन चिमुकलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी असलेल्या अक्षय शिंदेचा एन्काऊंटर झाला. तर दुसरीकडे चिमुकलींचा अत्याचार झालेल्या संबंधित शाळेच्या संस्था चालकांनी अटकपूर्व जामिनासाठी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

याबाबत मंगळवारी मुंबई हायकोर्टात सुनावणी झाली. त्यात बदलापूर प्रकरणी शाळेच्या ट्रस्टींना आता मुंबई हायकोर्टाने झटका दिला आहे. ट्रस्टींचा कोर्टाने अटकपूर्व जामीन नाकारला आहे. बदलापूर येथे ऑगस्ट महिन्यात एका शाळेत दोन चिमुकलींवर अत्याचार झाला होता, ज्या शाळेत हा किळसवाणा प्रकार घडला, त्या शाळेचे अध्यक्ष आणि विश्वस्तांनी याप्रकरणी अटकपूर्व जामिनासाठी मुंबई उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता. पान २ वर

## ऐतिहासिक वारसा जपणे सर्वांचे कर्तव्य - पालकमंत्री रविंद्र चव्हाण



● पालघर, सतीश सोनावणे :

आपल्याला लाभलेले शौर्याचे स्मरण करून देणारे गड, कील्ले हे आपल्या देशाची अमुल्य संपत्ती असून या ऐतिहासीक वारसाला जपणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी केले.

जिल्हा नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय, येथे शिरगांव येथील शिरगाव किल्ला या राज्य संरक्षित स्मारकाचे जतन व दुरुस्ती कामाचे भूमिपूजन तसेच जव्हार येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे भगवान बिरसा मुंडा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामांतरण दूरदृष्य प्रणालीद्वारे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी पालकमंत्री रविंद्र चव्हाण बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, माजी खासदार राजेंद्र गावित, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे तसेच जिल्ह्यातील वरीष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शिरगाव येथिल किल्ल्याची दुरुस्ती केल्यामुळे या भागामध्ये पर्यटनाला चालना मिळेल यामुळे स्थानिक नागरिकांना रोजगार मिळेल या किल्ल्याच्या दुरुस्ती कामासाठी ६ कोटी २४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून इतर ऐतिहासीक वास्तूंचे टप्प्या टप्प्याने दुरुस्तीचे कामे हाती घेण्यात येतील असे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. पान २ वर

## नायर रुग्णालयातील लैंगिक छळवणूक प्रकरणाची मुख्यमंत्र्यांकडून गंभीर दखल



● मुंबई, विशाल कारंडे :

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयातील लैंगिक छळवणुकीच्या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले असून पीडितांना न्याय मिळवून देण्याची खात्री दिली आहे.

अधिष्ठातांच्या बदलीचे तसेच विशेष चौकशी समिती नेमण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांना दिले. रुग्णालयातील कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अतिरिक्त उपाययोजना राबवण्यात याव्यात, अशा सूचनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या. या प्रकरणाची सखोल चौकशी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, आरोग्य क्षेत्रातील अशा घटना अत्यंत गंभीर आहेत. या प्रकरणाचा तपास करून दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल. रुग्णालयातील सर्वांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. पान २ वर

## 'मंदिर असो वा दर्गा, बेकायदेशीर बांधकाम पाडणार'

### बुलडोझर कारवाईवर सर्वोच्च न्यायालयाकडून भूमिका स्पष्ट

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी (१ ऑक्टोबर २०२४) बुलडोझर कारवाई प्रकरणाची सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने बुलडोझर कारवाई व अतिक्रमणाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली.

न्यायालयाने म्हटले की, सार्वजनिक सुरक्षा सर्वोपरि आहे. रस्ते, जलकुंभ किंवा रेल्वे रुळांवर अतिक्रमण करणारी कोणतीही धार्मिक इमारत हटविली पाहिजे. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे, बुलडोझर कारवाई आणि अतिक्रमणविरोधी मोहिमेचे निर्देश




सर्व धर्मातील नागरिकांसाठी समान असतील, असे न्यायालयाने म्हटले.बुलडोझरच्या कारवाईवर सर्वोच्च न्यायालयाकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, सार्वजनिक सुरक्षा सर्वोपरि आहे आणि रस्त्यांवरील कोणतीही धार्मिक वास्तू हटवली पाहिजे. या गुन्ह्यातील आरोपींवरील बुलडोझर कारवाईविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर मंगळवारी न्यायालयात सुनावणी झाली. न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांनी सुनावणी घेतली.

लोकांची सुरक्षा सर्वोपरि असल्याचे न्यायालयाचे म्हणणे आहे. मंदिर असो वा दर्गा, रस्ते, जलमार्ग किंवा रेल्वे रुळांना अडथळा ठरणारी कोणतीही धार्मिक वास्तू हटवावी. त्याचबरोबर भारत हा धर्मनिरपेक्ष देश असून बुलडोझर कारवाईबाबतचा आपला आदेश कोणत्याही धर्माचा विचार न करता सर्व नागरिकांसाठी असेल, यावरही न्यायालयाने भर दिला आहे. पान २ वर

## पुण्यात ७ नवीन पोलीस ठाण्यांना मंजुरी

### ६० कोटींच्या निधीला प्रशासकीय मान्यता

● पुणे, अभिजित येरल्लू :




शहराचा वाढता विस्तार, गुन्हेगारी, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न विचारात घेऊन गृह विभागाने पुणे शहरात सात नवीन पोलीस ठाण्यांना मंजुरी दिली. त्यासाठी ६० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. नवीन पोलीस ठाण्यांतील कामकाजासाठी ८१६ पोलीस कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आठवडाभरात सातही ठिकाणी कामकाजास सुरुवात होईल, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली. पुणे पोलिस आयुक्तालयात आंबेगाव, नांदेड सिटी, बाणेर, खराडी, वाघोली, काळेपडळ आणि फुरसुंगी ही नवीन पोलिस ठाणे सुरू होणार आहेत. त्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. पान २ वर

## ठाणे महानगरपालिकेचा ४२ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

● ठाणे, रोहित जैसवार :



ठाणे महानगरपालिकेचा ४२वा वर्धापन दिन मंगळवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते महापालिका ध्वजाचे आरोहण झाले. त्यांच्यासोबत अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी आणि अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे आणि अग्निशमन विभागाचे प्रमुख गिरिश झळके उपस्थित होते. त्यानंतर, अग्निशमन दल, सुरक्षा दल, एमएसएफ यांनी संचलन केले. या संचलनाचे नेतृत्व जवाहर बाग अग्निशमन केंद्राचे केंद्रप्रमुख संदीप कदम आणि बाळकूम अग्निशमन केंद्राचे केंद्रप्रमुख प्रमोद काकळीज यांनी केले.

ध्वजारोहण व संचलन सोहळ्यानंतर, कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात महनीय नेत्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आयुक्त सौरभ राव यांनी अभिवादन केले. यावेळी, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त अनघा कदम, गजानन गोदेपुरे, उमेश बिरारी, सचिन पवार, दिनेश तायडे, शंकर पाटोळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी, टीएमटीचे व्यवस्थापन भालचंद्र बेहरे, सहाय्यक आयुक्त अलका खैरे आणि भालचंद्र घुगे, उपनगर अभियंता गुणवंत झांब्रे, विनोद पवार, मुख्य वैद्यकीय अधिकारी चेतना के, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी तसेच इतर वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.त्याचप्रमाणे, वर्धापन दिनाचे औचित्य साधून शहरातील महनीय नेत्यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पान २ वर

## रत्नागिरीतील मुळ्ये हायस्कूल- महाविद्यालयातील तीन मुलींचा विनयभंग

● रत्नागिरी, दिगंबर जाधव :



संगमेश्वर तालुक्यात असलेल्या कोळंबे येथील कमळजाबाई पांडुरंग मुळये हायस्कुल व ज्युनिअर कॉलेजच्या तीन विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याप्रकरणी संस्थेचा अध्यक्ष व त्यांचा मुलगा आणि मुख्याध्यापक अशा तिघांविरोधात संगमेश्वर पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा शहर पोलीस ठाण्यातून संगमेश्वर पोलीस ठाण्यात झिरो नंबरने पाठवण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांमध्ये अध्यक्ष नयन मुळये (वय ६८), त्याचा मुलगा प्रथमेश मुळये आणि मुख्याध्यापक संजय मुळये या तिघांचा समावेश आहे. याविषयी संस्थेच्या ग्रंथपाल महिलेने रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतर हा गुन्हा संगमेश्वर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे. पान २ वर

# राज्यात ८ नवीन वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी ; आता वर्षाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून ४८५० विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश

**मुंबई (राकेश गायकवाड):** शासनाच्या पाठपुराव्यामुळे राज्यात नवीन ८ वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी मिळाली आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या मंत्री कालावधीत मुंबई, नाशिक, गडचिरोली, अमरावती, वाशिम, जालना, बुलडाणा, अंबरनाथ, भंडारा, आणि हिंगोली अशा एकूण १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी मिळाली आहे. या आठ महाविद्यालयात एकूण ८०० विद्यार्थ्यांना एमबीबीएस करीता प्रवेश मिळणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचे शासनाचे धोरण आहे. आता राज्यात एकूण ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आहेत. आता वर्षाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून ४८५० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. राज्यातील अनेक विद्यार्थी विविध देशांमध्ये वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी जात होते. विद्यार्थी संख्या वाढल्याने आता विद्यार्थी राज्यातच शिक्षण घेऊ शकतात. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या धोरणामुळे तसेच केंद्रीय आरोग्य मंत्री, राज्यमंत्री यांच्याही सहकार्यामुळे राज्यात कमी कालावधीत इतक्या मोठ्या प्रमाणात वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी मिळाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या पाठपुराव्यामुळे राज्यात वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी मिळाली. या १० महाविद्यालयांच्या बांधकामाकरिता व इतर आवश्यक साधनसामुग्रीसाठी प्रत्येक महाविद्यालयास ४०३ कोटी रुपये उपलब्ध करून देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे बांधकाम दर्जेदार, गुणवत्तापूर्वक होण्यासाठी केंद्र शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामार्फत कामे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# स्वच्छता ही सेवा अभियानात जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी पारसिक रेतीबंदर येथे साकारली मानवी साखळी

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी घेतला सफाई मोहिमेत सहभाग

**ठाणे (रोहित जैसवार) :** 'स्वच्छता ही सेवा' या अभियानात मंगळवारी पारसिक रेती बंदर येथे प्लास्टिकच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या साखळीचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानात परिसरातील हजारो विद्यार्थी सहभागी झाले. प्लास्टिकमुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यासाठी मोठ्या आकाराचा देव मासा आणि त्याच्या पोटात साठलेला प्लास्टिकचा कचरा हे प्रतिक साकारण्यात आले. तसेच, विद्यार्थ्यांनी प्लास्टिक न वापरण्याची प्रतिज्ञाही यावेळी केली. या उपक्रमास महापालिका



आयुक्त सौरभ राव यांनी भेट दिली. घोषवाक्यांसह सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले.

याच निमित्ताने, पारसिक रेतीबंदर घाट येथे साफसफाई मोहिमेचेही आयोजन करण्यात आले होते. त्यात महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, सहाय्यक आयुक्त सचिन बोरसे यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले. विसजर्न घाटावर वाहून आलेले निर्माल्य, तरंगता कचरा यावेळी बाहेर काढण्यात आला.

'स्वच्छता ही सेवा' या अभियानाअंतर्गत गेले पंधरा दिवस सुरू असलेल्या उपक्रमांची सांगता, तसेच स्पर्धांच्या पारितोषिक वितरणाचा सोहळा बुधवार, ०२ ऑक्टोबर रोजी उपवन तलावालगतच्या ॲम्फी थिएटर येथे होणार आहे. या सोहळ्यातही नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहन उपायुक्त (घनकचरा) मनीष जोशी यांनी केले आहे.



**ठाणे (सुचित शिंदे)-** भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ मा.नगरसेवक कोपरी पाचपाखाडी विधानसभा निवडणुक प्रभारी भरत चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ३ ऑक्टोंबरला जेष्ठ मा.नगरसेवक भरत चव्हाण यांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्त विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले असून सोमवारी तारामाऊली सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने कोपरी परिसरातील शाळांना मोफत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे वाटप करण्यात आले. कोपरी परिसरातील हुतात्मा हायस्कुल, जीवनज्योती, युनायटेड, नाखवा हायस्कुल या शाळांना मोफत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मा.नगरसेवक भरत चव्हाण, भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव ओमकार चव्हाण, शाळेचे व्यवस्थापक शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माहिती अधिकार कायद्यात सामान्य माणसाला दक्ष नागरिक घडविण्याची ताकद

# आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त ठामपातर्फे व्याख्यानाचे आयोजन

**ठाणे (यश सावंत) :** शासन व प्रशासन पारदर्शक, जबाबदारीने चालावे हा उद्देश माहिती अधिकार या कायद्याचा आहे. हा कायदा लागू होवून १९ वर्षे झाली असून या कायद्यामुळे गैरप्रकार उघड होण्यास मदत होत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अभ्यासामुळे व वापरामुळे व्यक्तीचे माहितीगार नागरिकांमध्ये रुपांतर होते. स्वाभिमानी, जबाबदार, प्रामाणिक व सार्वजनिक हितासाठी कटिबद्ध असणारा दक्ष नागरिक घडविण्यांची अंगभूत



शक्ती माहिती अधिकारामध्ये असल्याचे माहिती अधिकारी कार्यकर्ता फेडरेशनचे अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी नमूद केले.

२८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाच्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेच्यावतीने सोमवारी (३० सप्टेंबर) कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात माहिती अधिकार कायदा या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी उपायुक्त उमेश बिरारी उपस्थित होते. सामान्य माणसाला त्याच्या नागरिक म्हणून असणाऱ्या शक्तीची जाणीव करुन देणारा व सामान्य माणसाला न्याय देणारा हा कायदा आहे. माहितीचा अधिकार याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. यामध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे, दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे, सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे आदींचा समावेश या अधिकारात असल्याचे श्री. सुभाष बसवेकर यांनी सांगितले.

# कळव्यामधील एका शाळेतील ३८ विद्यार्थ्यांना विषबाधा

**ठाणे ( रोहित जैसवार )–** शाळेत देण्यात येणाऱ्या अन्न पदार्थातून विद्यार्थ्यांना पोटदुखी आणि उलटीचा त्रास होऊ लागल्याचा प्रकार कळवा येथील सहकार विद्या प्रसारकर मंडळ शाळेमध्ये मंगळवारी उघडकीस आला आहे. या शाळेतील ३८ विद्यार्थ्यांना उपचारासाठी ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले असून या विद्यार्थ्यांना विषबाधा झाली असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली.

कळवा येथील सहकार विद्या प्रसारकर मंडळ शाळेत मंगळवारी दुपारच्या सत्रातील विद्यार्थ्यांना नेहमीप्रमाणे मधल्या सुट्टीत शाळेतून भात, डाळ आणि मटकीची उसळ देण्यात आली होती. हे जेवण झाल्यानंतर ५ ते ६ विद्यार्थ्यांना उलट्या सुरु झाल्या. तर, काहींच्या पोटात दुखू लागले. एकावेळी येवढ्या विद्यार्थ्यांना त्रास होऊ लागल्यामुळे शाळा प्रशासनाने कळवा रुग्णालयात संपर्क साधला आणि रुग्णवाहिका बोलावून घेतली. एकूण ३८ विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या घराच्यांना सायंकाळी उशिरा माहिती दिली. माहिती मिळताच, विद्यार्थ्यांच्या पालकांनी रुग्णालयात धाव घेतली. डॉक्टरांनी त्या विद्यार्थ्यांना तपासले असता, त्यांना अन्नातून विषबाधा झाल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी रुग्णालय प्रशासनाने शाळेकडे चौकशी केली. त्यावेळी जेवणात देण्यात आलेली मटकी ही गेले दोन ते तीन दिवसांपासून भिजत ठेवल्याची माहिती समोर आली. या मटकीच्या भाजीचा विद्यार्थ्यांना त्रास झाला असावा असा अंदाज रुग्णालय प्रशासनाकडून करण्यात येत आहे. हे सर्व विद्यार्थी ८ ते ११ वयोगटातील असून या सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.या पूर्वी देखील येथे देण्यात येणाऱ्या अन्नात झुरळ, किडे आढळून आले असल्याचा दावा माजी नगरसेवक मिलिंद पाटील यांनी केला आहे. तसेच पालकांना देखील ही माहिती दिली असल्याचे ते म्हणाले. त्यातही शालेय पोषण आहार हे आधी शाळेच्या मुख्याध्यपकांनी खाणे अपेक्षित असताना त्यांनी तसे न करता थेट विद्यार्थ्यांना दिल्याचा आरोपही पाटील यांनी केला आहे.







ठाणे -- ठाण्यातील बाबुभाई पेट्रोल पंप जवळ ब्रह्माळा तलाव मध्ये उद्यानात इ लव्ह ब्रह्माळा याची दुरावस्था झाली असून या कडे प्रसाशन लक्ष देणार का

# ठाण्याच्या विकासासाठी कटिबद्ध राहून काम करणार : महापालिका आयुक्त सौरभ राव

**ठाणे (विशाल कारंडे) :** ठाणे महापालिकेच्या निर्मितीपासून ते आजतागायत गेली ४२ वर्षे ठाणेकरांना विविध सोयी सुविधा पुरवितानाच ठाण्याच्या विकासासाठी कटिबद्ध राहून कार्य करणारी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून ठाणे महापालिकेने लौकिक प्राप्त केला आहे, हा लौकिक यापुढेही उंचावत राहण्यासाठी समर्पित भावनेने काम करणार असल्याचे प्रतिपादन ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी येथे केले.

ठाणे महानगरपालिकेचा ४२ वा वर्धापन दिन आज राम गणेश गडकरी रंगायतन येथे महापालिका अधिकारी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितांना शुभेच्छापर मार्गदर्शन करताना आयुक्त सौरभ



राव यांनी ठाणे महापालिका राबवित असलेल्या लोकाभिमुख योजनांचा आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, उमेश बिरारी, मीनल पालांडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी चेतना नितिल आदी उपस्थित होते.ठाणे शहराचे बदलते स्वरुप, विकासाचे बदलते स्वरुप, राज्य तसेच देशाचे जे धोरण आहे त्याच्याशी सांगड घालून शहराचा विकास करणे हे महापालिका करत आहे. महापालिकेचे जे विविध विभाग आहेत, समाज विकास विभाग, पाणी पुरवठा, पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्वच्छता या सर्व विभागांशी नागरिकांशी संबंध येत असतो. ठाणे बदलतयं.. स्मार्ट ठाण्याकडे महापालिका नियोजनबद्ध वाटचाल करीत आहे. १९८२ ला ठाणे महापालिकेची स्थापना झाल्यापासून ज्या पध्दतीने महापालिका काम करत आहे, त्याचपध्दतीने नवीन आव्हांनाचा स्वीकार करुन यापुढेही समर्पित भावनेने ठाणे महापालिका काम करीत राहणार असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

या निमित्त ठाणे महापालिका अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मनोरंजनासाठी अशोक हांडे संकल्पीत लिखित आणि दिग्दर्शित मराठी बाणा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ठाणे महानगरपालिकेच्यावतीने घेण्यात आलेल्या गणेशोत्सव आरास स्पर्धेतील विजेत्या मंडळांना आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते पारितोषिक देवून गौरविण्यात आले.

# टेंभी नाका येथे यंदा हिमाचल प्रदेशातील जटोली शिवमंदिराची भव्य प्रतिकृती उभारण्यात येणार



**ठाणे (राकेश गायकवाड ) -** धर्मवीर आनंद दिघे यांच्या टेंभी नाका येथील जय अंबे माँ ट्रस्टच्या दुर्गेश्वरीच्या भव्य नवरात्र उत्सवात यंदा हिमाचल प्रदेशातील जटोली शीव मंदिराची भव्य प्रतिकृती उभारण्यात येत असुन सजावटीच्या तयारी अंतिम टप्यात आहे.जय अंबे माँ सार्वजनिक विश्वस्त संस्थेतर्फे टेंभीनाका येथे भव्य स्वरुपात नवरात्र उत्सव साजरा केला जातो.शिवसेनेचे तत्कालीन जिल्हाप्रमुख दिवंगत आनंद दिघे यांनी या नवरात्र उत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. येथील देवी दुर्गेश्वरी नवसाला पावते अशी भाविकांची श्रध्दा असल्याने नवरात्रौत्सवाच्या नऊ दिवसात टेंभी नाक्यावर मोठी गर्दी उसळते. राज्यभरातून लाखोच्या संख्येने भाविक या नवरात्रौत्सवाला आवर्जून उपस्थित राहतात. यंदा या नवरात्रोत्सवाचे ४६ वे वर्ष आहे. प्रतीवर्षा प्रमाणे हा नवरात्र उत्सव मोठा धुमधडाक्यात पार पडणार असून यंदा हिमाचल प्रदेशातील जटोली शीव मंदिराचा देखावा साकारण्यात येत आहे.

# टेंभू योजनेच्या भूमिपूजनातून काळ्या आईचे पांग फेडण्याचा प्रयत्न - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**सांगली (दिगंबर जाधव) :** टेंभू विस्तारीत प्रकल्पातील घटक कामांच्या भूमिपूजनातून काळ्या आईचे पांग फेडण्याचा प्रयत्न केला आहे. या योजनेतून लाभक्षेत्रातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. त्यामुळे या योजनेच्या सहाव्या टप्प्यास दिवंगत आमदार अनिल बाबर यांचे नाव देऊ, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केले


टेंभू विस्तारीत प्रकल्पातील सांगली जिल्ह्यातील तीन घटक कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यानंतर विटा येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी टेंभू योजनापुर्तीसाठी



दिवंगत आमदार अनिल बाबर यांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगितले. कार्यक्रमास राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई, पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या घटक कामांमध्ये टेंभू विस्तारीत प्रकल्पातील सांगली जिल्ह्यातील टप्पा क्र. ६, पळशी उपसा सिंचन योजना टप्पा क्र. ५ वितरण व्यवस्था व कामथ गुरूत्व नलिका यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, सांगली जिल्ह्यातील टेंभू, म्हैसाळ योजनांना भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. यामुळे त्या क्षेत्रातील जमीन ओलिताखाली येऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे, असे ते म्हणाले. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी टेंभू विस्तारित प्रकल्पांतील विविध कामांची माहिती घेतली. भूमिपूजन झालेल्या कामांची माहिती टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाच्या रु.7,370.03 कोटी रकमेच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय अहवालास मान्यता दिलेली आहे. मूळ टेंभू योजनेतील सातारा जिल्ह्यातील कराड, सांगली जिल्ह्यातील कडेगाव, खानापूर, आटपाडी, तासगांव व कवठेमहांकाळ तसेच सोलापूर जिल्ह्यातील सांगोला या सात तालुक्यातील 240 गावांतील 80,472 हेक्टर सिंचन क्षेत्र निर्मितीचे काम पूर्णत्वास आले आहे. या करिता 22.00 अ.घ.फू. इतका पाणी वापर होणार आहे.

मूळ टेंभू प्रकल्पाच्या लाभक्षेत्रालगत परंतु सिंचनाच्या लाभापासून वंचित असणाऱ्या तसेच अंशत: सिंचनाचा लाभ मिळणाऱ्या गावांची टेंभू प्रकल्पाचा लाभ मिळणेसाठी अनेक वर्षापासूनची मागणी होती. टेंभू विस्तारीत योजनेकरिता सांगली जिल्ह्यातील खानापूर, तासगांव, आटपाडी, कवठेमहांकाळ, जत तसेच सातारा जिल्ह्यातील खटाव, माण व सोलापूर जिल्ह्यातील सांगोला या आठ तालुक्यातील 109 गावांतील 41,003 हे. सिंचन क्षेत्राकरिता वाढीव 8 अ.घ.फू. पाणी उपलब्धतेस सप्टेंबर 2023 मध्ये महाराष्ट्र शासनाने अंतिम मान्यता दिलेली आहे.

# किसन नगर येथील आदर्श इंग्लिश स्कूलमध्ये डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अवकाश निरीक्षण केंद्राचे उद्घाटन संपन्न



**ठाणे (सुचित शिंदे )-** ठाण्यातील किसननगर येथील आदर्श इंग्लिश स्कुलमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अवकाश निरीक्षण केंद्राचे उदघाट्न संपन्न झाले.हेंकेल अधेसिव्हज टेक्नॉलॉजिज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (हेंकेल इंडिया ) च्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या या अवकाश निरीक्षण केंद्राचे उदघाट्न समारंभी ज्येष्ठ शास्त्रज्ञ काशिनाथ देवधर, हेंकेल इंडिया चे मुख्य आर्थिक अधिकारी कृष्ण प्रकाश, सौ. मीरा कोर्डे, प्रसाद खंडागळे, आदर्श विकास मंडळाचे अध्यक्ष सचिन मोरे, कार्यकारी विश्वस्त सौ. श्रद्धा मोरे, प्राचार्य संतोष गावडे, हेंकेल इंडियाचे सीएसआर सदस्य कुंजल पारेख व संदीप पेटकर आदी मान्यवर उपस्थित होते."विद्यार्थ्यांनी अवकाश निरीक्षण छंद म्हणून नाही तर संशोधन म्हणून हाती घेणे गरजेचे आहे ज्याद्वारे देशाच्या विकासात आपले योगदान देता येईल" असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ काशिनाथ देवधर यांनी व्यक्त केले. तसेच आदर्श इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थ्यांसोबत इतरही शाळेच्या विद्यार्थ्यांना या केंद्राचा लाभ घेता यावा, असे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.प्रसाद खंडागळे यांनी अवकाश संशोधन क्षेत्रात विद्यार्थ्यांची आवड निर्माण व्हावी यासाठी विविध प्रयोग कसे करता येईल याबाबतचे मार्गदर्शन करत असताना यापूर्वी सुरु झालेल्या १२ अवकाश निरीक्षण केंद्रामधील मिळत असलेल्या यशाचा आढावा घेतला.

# ‘घात’ चित्रपटाचे सर्वत्र उत्स्फूर्त स्वागत! ‘हॉलिवूडच्या चित्रपटांशी केली जातेय तुलना!






मुंबई (प्रतिनिधी) : गेल्या शुक्रवारीप्रदर्शित झालेल्या ‘घात’ चित्रपटाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. अत्यंत मनोवेधक आणिथरारक मांडणी, नेत्रसुखद लोकेशन्स आणि चित्ताकर्षक छायाचित्रण, उत्कंठावर्धक संगीतआणि उत्कृष्ठ कथाबीज हे सारं एकाच चित्रपटात म्हणजे सोने पे सुहागा! अस्सल अभिनय आणित्यातील बिनचे कलावंत......! असं सबकुछ असलेला हा चित्रपट साऱ्या विश्वात कुतूहल निर्माणकरण्यात यशस्वी झाला आहे. मुंबई, ठाणे, डोंबिवली, कल्याण, नवी मुंबई, पनवेल, पुणे,सांगली, कोल्हापूर, संभाजीनगर, नागपूर अश्या शहरामध्ये या चित्रपटाला वाढता प्रतिसादलाभतोय. चित्रपटाला मिळत असलेलं यश समाधान देत असून खास विदर्भात चित्रित झालेल्या या चित्रपटाची तुलना प्रेक्षक हॉलिवूडच्या चित्रपटांशी करीत आहेत. नागपूर येथील एका शोला चित्रपटात भूमिका केलेली विदर्भातील कलावंतांनी अचानक उपस्थिती दर्शविली आणि रसिकांच्याआनंदाला उधाण आले. चित्रपटात छोट्या छोट्या भूमिका जिवंत करणाऱ्या या कलावंतांना पाहून प्रेक्षक अगदी भारावून गेले होते. काहींनी हा चित्रपट मराठीतला शोले असल्याचे सांगितले तर काहींनी थेट हॉलिवूडच्या चित्रपटांसोबत तुलना करून कलावंतांचे कौतुक केले.

आपल्या मुंबई पुण्यात चित्रपटांतील कलावंत नेहमीच प्रेक्षकांना भेटत असतात, त्यांच्याशी संवाद साधत असतात, छायाचित्रे - सेल्फी घेत असतात, परंतु मराठवाडा विदर्भात असं अभावानेच घडताना दिसते. मात्र विदर्भातील दुर्गम ठिकाणी चित्रीकरण करण्याचा धाडसी विचार दिग्दर्शक छत्रपाल निनावेंनी नुसता केलाच नाही तर तो तडीसही नेला. प्रेक्षकांना जे द्यायचे ते उत्तमच असावे या विचाराने, कुठलीही तडजोड न करता या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी त्यांनी थेट गडचिरोलीचे घनदाट जंगल निवडलं. आपल्या गोष्टीसाठी हवं ते शोधून, अनेक अडथळे पार करून त्यांनी गडचिरोली - छत्तीसगडच्या दुर्गम भागात अनेक दिवस संपूर्ण चित्रपटाच्या युनिटसोबत अगदी दुर्गम भागात या चित्रपटाचे चित्रीकरण करण्याचे धाडस केले आणि त्यात ते यशस्वीही झाले...त्यांनी या चित्रपटासाठी निवडलेला घनदाट नक्षली जंगलाचा बॅगड्रॉप आणि त्यासाठी सर्वांनी जीवावर उदार होऊन घेतलेल्या मेहनतीचे कौतुक प्रेक्षक चित्रपट पाहून करतात ते समाधान लेखक दिग्दर्शक, कलावंत निर्माते यांच्या चेहऱ्यावर लकाकत आहे. महाराष्ट्रात सर्वत्र या चित्रपटाची विशेष चर्चा होत असून चित्रपटाला वाढता प्रतिसाद मिळत आहे.

माओवादी बंडखोरांनी घेरलेल्या जंगलात हा सिनेमा आकाराला येतो. माओवादी बंडखोर, सामान्य नागरिक, पोलिस यांच्यातील तणावपूर्ण आणि रहस्यपूर्ण पार्श्वभूमीवर सिनेमा रंगत जातो. शिलादित्य बोरा यांची ‘'प्लॅटून वन', मनीष मुंद्रा यांची ‘दृश्यम फिल्म्स' आणि मिलापसिंह जडेजा, संयुक्ता गुप्ता आणि कुणाल कुमार यांनी मिळून सिनेमाची निर्मिती केली आहे. ‘घात' सिनेमात मराठीतील अत्यंत संवेदनशील अभिनेता जितेंद्र जोशी, मिलिंद शिंदे, सुरुची आडारकर, जनार्दन कदम आणि धनंजय मांडवकर यांच्या मुख्य भुमिका आहेत. त्यांच्यासह या चित्रपटात स्थानिक कलाकार संग्रामसिह ठाकूर, विकास मुडकी, काजल रंगारी, राहुल गावंडे, अजय लोणारे, विनोद राऊत, गिरीधर फताळे, निरज धानी, महेंद्र मस्के, गणेश देशमुख, अदित्य बुलकुंदे, रतन सोमवारे, पवन ठाकरे, शैलेश पाटील, अतुल खंदारे यांच्याही लक्षवेधी भूमिका आहेत.

## अमेरीकन कलाकारांनी मराठमोळ्या चित्रकाराकडून गिरवले चित्रकलेचे धडे

अमेरिकन कला विद्यार्थी पराग बोरसेच्या पेंटिंग्समागील सर्जनशील प्रक्रियेचा अभ्यास करत आहेत. भारतीय कलाकार पराग बोरसे यांना अमेरिकेतील अनेक सन्माननीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे, काही दिवसांपूर्वीच पेस्टल सोसायटीने पराग बोरसे यांना फ्लोरा बी. गुफिनी स्मृती पुरस्काराने सन्मानित केले आहे.




अमेरिकेतील कलाकार हे पराग बोरसे यांच्या चित्रातील परंपरा आणि संस्कृतीने खूप प्रभावित आहेत. म्हणूनच न्यू जर्सीच्या पेस्टल सोसायटीने 29 सप्टेंबर 2024 रोजी मेडिसन हाऊस, 25, कुक एव्हेन्यू, मेडिसन, न्यू जर्सी येथे एका पेस्टल पोर्ट्रेट कार्यशाळेसाठी पराग बोरसे यांना आमंत्रित केले होते. सुमारे 14 विद्यार्थ्यांनी चित्रप्रक्रिया समजून घेण्यासाठी आणि शिकण्यासाठी भाग घेतला होता.. पराग बोरसे यांनी लाल रंगाचा पगडी परिधान केलेल्या आणि मोठ्या मिशा आणि दाढी असलेल्या महाराष्ट्रातील एका गावकऱ्याच्या चित्राचे प्रात्यक्षिक दिले आहे. सर्व विद्यार्थी खूप प्रभावित झाले आहेत आणि त्यांच्याकडून भविष्यात देखील भारतीय संस्कृतीबद्दल अधिक जाणून घेण्यास उत्सुक आहेत.

## ‘नवरा माझा नवसाचा २’ चित्रपटाची बॉक्स ऑफिसवर जोरदार घौडदोड

२० सप्टेंबरला प्रदर्शित झालेला ‘नवरा माझा नवसाचा २' चित्रपट प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस उतरला आहे. प्रेक्षक हा चित्रपट पाहण्यासाठी तुफान गर्दी करताना दिसत आहेत. त्यामुळे सचिन पिळगांवकर निर्मित आणि दिग्दर्शित ‘नवरा माझा नवसाचा २' बॉक्स ऑफिसवर चांगलीच कमाई करत आहे. २००४ साली प्रदर्शित झालेल्या ‘नवरा माझा नवसाचा' या चित्रपटाचा चाहता वर्ग खूप मोठ्या प्रमाणात आहे. अजूनही हा चित्रपट तितक्याच आवडीने पाहिला जातो. ‘नवरा माझा नवसाचा' चित्रपटातील गाणी असो, डायलॉग असो किंवा भूमिका आजही त्यावर मराठी रसिक प्रेक्षक भरभरून प्रेम करतात. तसाच आता ‘नवरा माझा नवसाचा २' ( Navra Maza Navsacha 2 ) चित्रपटाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद देत आहेत.‘नवरा माझा नवसाचा २' या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, सचिन पिळगांवकर, सुप्रिया पिळगांवकर, स्वप्नील जोशी, हेमल इंगळे, अलीसागर, विजय पाटकर, निर्मिती सावंत, निवेदिता सराफ, वैभव मांगले, सिद्धार्थ जाधव, संतोष पवार, जयवंत वाडकर अशी दिग्गज कलाकारांची फौज पाहायला मिळत आहे.

## बांगलादेशला हरवताच भारतीय संघाचं WTC फायनलमध्ये स्थान निश्चित




श्रीलंकेच्या क्रिकेट संघानं अलीकडेच आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (WTC) मध्ये न्यूझीलंडला कसोटी मालिकेत पराभूत करुन भारतीय संघाचं गणित बिघडवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. तसंच पावसानंही हे गणित बिघडवण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. पण भारतीय संघ आपल्या गोलंदाजी आणि फलंदाजीच्या दोन्ही प्रयत्नांना हाणून पाडण्याचा निर्धार केला आहे. बांगलादेशविरुद्धची कानपूर कसोटी भारतानं 7 गडी राखत जिंकली आहे.फलंदाजीत केले अनेक विक्रम : भारत आणि बांगलादेश क्रिकेट संघ यांच्यात कानपूर इथं मालिकेतील दुसरा कसोटा सामना खेळला गेला. त्यातील पहिले तीन दिवस पावसानं वाहून गेले. तीनही दिवस 35 षटकं खेळली गेली. पण हा सामना चौथ्या दिवशी पूर्णपणे खेळला गेला, ज्यात भारतीय संघानं गोलंदाजी आणि शानदार फलंदाजी करत सामन्यावर पकड निर्माण केली. चौथ्या दिवसाचा खेळ सुरु झाला तेव्हा नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशचा संघ 233 धावांवर गडगडला होता. यानंतर भारतीय संघानं बेझबॉलपेक्षा आक्रमक खेळ खेळताना 9 बाद 285 धावा करुन डाव घोषित केला. अशा प्रकारे भारतीय संघानं पहिल्या डावात 52 धावांची आघाडी घेतली. भारतीय संघानं आपल्या फलंदाजीनं इतिहास रचला. भारतीय संघ आता कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद 50, 100, 150, 200 आणि 250 धावा पूर्ण करणारा संघ बनला आहे.

WTC फायनलमध्ये भारताचा मार्ग सोपा : कानपूर कसोटीनंतर भारतीय संघाला 2023-25 या WTC च्या मोसमात आणखी 8 सामने खेळावे लागणार आहेत. बांगलादेशला पराभूत केल्यामुळं आता भारतीय संघाला उरलेल्या 8 पैकी फक्त 4 सामने जिंकावे लागणार आहेत. यामुळं कोणत्याही संघाच्या विजय किंवा पराभवावर अवलंबून राहावं लागणार नाही आणि त्यांनी अंतिम फेरीतील आपलं स्थान निश्चित जवळपास निश्चित केलं आहे.

## गोविंदाच्या पायाला कशी लागली गोळी?

अभिनेता तथा शिवसेना नेता गोविंदानं चुकून रिव्हॉल्व्हरमधून गोळी झाडली. यावेळी पायाला गोळी लागल्यानं अभिनेता गोविंदा जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं.



ही माहिती मुंबई पोलिसांकडून देण्यात आली.

अभिनेता गोविंदा जखमी झाल्यानंतर पोलीस त्याच्या घरी पोहोचले. त्यांनी गोविंदाची रिव्हॉल्व्हर ताब्यात घेतली. या प्रकरणाचा पोलिसांनी तपास सुरू केला. गोळी लागल्यानं गोविंदाच्या पायातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. त्यामुळे त्याची तब्येत बिघडली. त्याला क्रिटी केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अभिनेता आणि शिवसेना नेता गोविंदा कोलकात्याला रवाना होण्याच्या तयारीत होते. गोविंदा आपले परवाना असलेले रिव्हॉल्व्हर कपाटात ठेवत होते.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून अभिनेता गोविंदाच्या प्रकृतीबाबत विचारपूस

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिनेता गोविंदा यांच्याशी संपर्क साधून त्यांच्यासोबत झालेल्या अपघातातबाबत विचारपूस केली. राज्य शासन व जनतेच्यावतीने लवकर बरे होण्यासाठी त्यांनी सदिच्छा व्यक्त केल्या आहेत.

गोविंदा आणि त्यांच्या कुटुंबियांना या कठीण काळात सर्व आवश्यक मदत मिळेल याची खात्री मुख्यमंत्री यांनी दिली. तसेच आमच्या सदिच्छा आणि प्रार्थना त्यांच्यासोबत आणि त्यांच्या कुटुंबासोबत असल्याचेही त्यांनी सांगितले.

गोविंदा हे भारतीय चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी अभिनयाद्वारे लाखो लोकांना आनंद दिला आहे. त्यांच्या प्रकृतीस्वास्थासाठी मुख्यमंत्री यांनी सदिच्छा व्यक्त केल्या.

## तासन् तास बसून काम करता? रोज करा ‘हे’ आसन आणि रहा तणावमुक्त

आजकालच्या बैठ्या जीनवशैलीमुळे बहुतांश लोकांना अनेक समस्यांचा सामना कारावा लागत आहे. ऑफिसकामासाठी अनेकांना तासन् तास लॅपटॉपसमोर किंवा कम्युटरसमोर बसून राहावं लागतं. कामाच्या व्यापामुळे आणि ताणामुळे अनेक लोक स्वतःच्या आरोग्याकडं दुर्लक्ष करतात. यामुळे पोट सुटणे, वजन वाढणे, पाठ-मान आणि कंबरदुखी वाढली आहे. अशा सगळयांसाठी काही व्यायाम अतिशय उपयुक्त ठरू शकतात. आम्ही कामाच्या व्यस्ततेमुळे वेळ न देवू शकणाऱ्यांसाठी काही योगासनं घेऊन आलो आहोत. हे योगासनं तुम्ही सहज करु शकता. नियमित 10 मिनिट स्वतःसाठी काढल्यास तुम्ही सुद्धा निरोगी जीवन जगू शकता. हे अतिशय सोप असं आसन आहे.



सर्वप्रथम तुम्ही तुमचे गुडघे वाकवून पायावर बसा. बसताना लक्षात ठेवा की तुमच्या दोन्ही पायांच्या अंगठ्यांमध्ये थोडं अंतर असावं. त्यानंतर आपले दोन्ही हात मांडीवर ठेवा. मान आणि पाठीचा कणा सरळ ठेवा. आता आपलं संपूर्ण वजन पायावर ठेवा आणि विश्रांती घ्या. नियमित वज्रासन केल्यास बद्धकोष्ठता, गॅस आणि अपचन सारख्या समस्या दूर होतात. तसंच वजन कमी करण्यासाठी वज्रासन उपयुक्त आहे. तसंच वज्रासनामुळे महिलांमधील मासिक पाळीची अनियमितता दूर होते. शरीरातील रक्ताभिसरण सुरळीत होते. यामुळे उच्च रक्तदाबाची समस्या देखील दूर होवू शकते.डोक शांत ठेवण्यासाठी पद्मासन चांगल आहे. तसंच गुडघेदुखीपासून मुक्ती मिळवायची असेल तर पद्मासन फायदेशीर आहे. दिवसभर काम करणाऱ्यासाठी शरीरात उर्जा हवी असते.X

## WTC Points Table मध्ये भारताची मोठी झेप

भारतीय संघाने ICC वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५ च्या अंतिम फेरीच्या दिशेने अजून एक मजबूत पाऊल टाकले आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने आणखी एक कसोटी मालिका जिंकली आहे. भारताने बांगलादेशचा २ सामन्यांच्या कसोटी मालिकेत एकतर्फी पराभव केला आहे. WTC 2023-25 सायकलमध्ये टीम इंडियाकडे अद्याप दोन कसोटी मालिका बाकी असतानाही, भारताने आपली स्थिती मजबूत करत पहिसे स्थान अधिक मजबूत केले आहे. त्याचवेळी, कानपूर कसोटी सामन्यात ७ विकेट्सने पराभव केल्यामुळे बांगलादेश संघाला WTC गुणतालिकेत मोठा धक्का बसला आहे.

## दिनविशेष

**घटना**

१९९४ : दुसरे महायुद्ध - जर्मन सैन्याने वॉर्सा उठाव संपवला.
१९६७ : थरगुड मार्शल - हे अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाचे पहिले कृष्णवर्णीय न्यायाधीश बनले.
१९५८ : गिनी देशाला फ्रान्सपासुन स्वातंत्र्य मिळाले.
१९५५ : इन्टिग्रल कोच फॅक्टरी सुरू झाली.
१९२५: जॉन लोगी बेअर्ड यांनी पहिल्या दूरदर्शन संचाचे प्रात्यक्षिक दाखवले.
१९०९: पुणे सेवासदन सोसायटी रमाबाई रानडे यांनी स्थापना केली.

**जन्म**

१९७१ : कौशल इनामदार संगीतकार व गायक
१९६८ : याना नोव्होत् ना- झेक लॉन टेनिस खेळाडू
१९६५ : मायिल सामी - भारतीय अभिनेते (निधन : १९ फेब्रुवारी २०२३)
१९४८ : डोना करण अमेरिकन फॅशन डिझायनर, DKNY चे संस्थापक
१९४८ : सिम कल्लास एस्टोनिया देशाचे माजी पंतप्रधान
१९४८ : पर्सिस खंबाटा - अभिनेत्री, मॉडेल आणि लेखिका, फेमिना मिस इंडिया १९६५ ( निधन : १८ ऑगस्ट १९९८)
१९४२ : स्टीव्ह सबोल - अमेरिकन दिग्दर्शक आणि निर्माता, NFL फिल्म्सचे सहसंस्थापक (निधन : १८ सप्टेंबर २०१२ )
१९४२ : आशा पारेख चित्रपट अभिनेत्री
१९३९ : बुधी कुंदरन - भारतीय क्रिकेटपटू (निधन: २३ जून २००६)
१९३८: वाहीद मुराद - पाकिस्तानी अभिनेते, निर्माते आणि लेखक (निधन: २३ नोव्हेंबर १९८३)
१९३४ : रजत कुमार कार भारतीय नाटककार, लेखक आणि प्रसारक - पद्मश्री (निधन: ८ मे २०२२)
१९३३ : जॉन गर्डन इंग्रजी जीवशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक नोबेल पारितोषिक

**मृत्यू**

२०२२: ॲटलास रामचंद्रन - भारतीय ज्वेलर, चित्रपट निर्माते आणि अभिनेते (जन्म: ३१ जुलै १९४२)
२०२२: ॲनी शेखर भारतीय राजकारणी, महाराष्ट्राच्या आमदार
१९९६: आंद्रे लुकानोव्ह - बल्गेरिया देशाचे ४०वे पंतप्रधान (जन्म: २६ सप्टेंबर १९३८)
१९८८: ॲलेक इझिगोनिस मिनी कारचे निर्माते (जन्म: १८ नोव्हेंबर १९०६)
१९८८: हमेंगकुबुवोनो नववा इंडोनेशिया देशाचे २रे उपाध्यक्ष (जन्म: १२ एप्रिल १९२२)
१९८७ : पीटर मेडावार - ब्राझिलियनइंग्रजी जीवशास्त्रज्ञ आणि प्राणीशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक (जन्म: २८ फेब्रुवारी १९१५)
१९८५ : रॉक हडसन - अमेरिकन अभिनेते (जन्म: १७ नोव्हेंबर १९२५) १९८२: चिंतामणराव देशमुख भारताचे अर्थमंत्री (जन्म: १४ जानेवारी १८९६)
१९८२: विल्यम बर्नबॅच - अमेरिकन जाहिरातदार, DDB वर्ल्डवाइडचे सह-संस्थापक (जन्म: १३ ऑगस्ट १९११)
१९७५: के. कामराज - तामिळ नाडूचे २रे मुख्यमंत्री व स्वातंत्र्यसेनानी - भारतरत्न (जन्म: १५ जुलै १९०३)

## राशि भविष्य

**मेष** - आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य संतुलित राखा, अध्यात्मिक आयुष्याचे हे पूर्वसूत्र आहे. 'सर्व चांगल्या आणि वाईट गोष्टी मनातूनच जन्माला येतात त्यामुळे मन हे जीवनाचे प्रवेशद्वार आहे.

**वृषभ** - निव्वळ मजा, आनंद तुम्ही लुटू शकाल - कारण आयुष्य संपूर्ण मजेत घालवणे हाच तुमचा विचार असतो. जे लोक टॅक्सी चोरी करतात ते आज मोठ्या त्रासात फसू शकतात म्हणून, तुम्हाला सल्ला दिला जातो की, टॅक्सी चोरी करू नका.

**मिथुन** - पुन्हा ऊर्जा मिळविण्यासाठी संपूर्ण विश्रांती घ्या. आज तुमचे धन बऱ्याच गोष्टींवर खर्च होऊ शकते तुम्हाला आज चांगले बजेट प्लॅन करण्याची आवश्यकता आहे यामुळे तुमच्या बऱ्याच समस्या दूर होऊ शकतात.

**कर्क** - नशिबावर हवाला ठेवून बसू नका, त्याऐवजी आपले आरोग्य सुधारण्याचा प्रयत्ना करा. भविष्यात असे होईल तसे होईल असे म्हणत राहू नका.

**सिंह** - भीती, चिंता तुमच्या सुखी समाधानी, आनंदी जगण्याला मारक ठरू शकते. आपल्या विचारांमधून आणि कल्पनांमधूनच चिंतेचा जन्म झाला आहे हे तुम्हाला लक्षात ठेवावे लागेल.

**कन्या** - तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा. आपली गुंतवणूक आणि भविष्यातील ध्येयांबद्दल गुप्तता बाळगा. मित्रमैत्रिणींबरोबरची सायंकाळ सुखदायक असेल.

**तूळ** - शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या तुम्हाला खचल्यासारखे वाटेल - थोडा आराम करा आणि सात्विक अन्नसेवन केल्यामुळे तुम्हाला ऊर्जा मिळेल.

**वृश्चिक** - तुमची शारिरीक क्षमता कायम राखण्यासाठी तुम्ही क्रीडा प्रकारांसाठी वेळ खर्च करण्याची शक्यता आहे. आर्थिक आघाडीवरील सुधारणा तुम्हाला तुमची प्रलंबित देणी आणि बिले देण्यास उपयोगी पडतील.

**धनु** - निसर्गाने आपल्याला लक्षणीय असा आत्मविश्वास आणि बुद्धिमत्तेचे दान दिले आहे, त्याचा उत्तम वापर करा. आज तुमची काही चल संपत्ती चोरी होऊ शकते म्हणून, जितके शक्य असेल याची काळजी घ्या.

**मकर** - खेळावर काही रक्कम खर्च करा, कारण निरंतर चिरस्थायी तरुणाईचे ते गुपित आहे. दिवसाच्या उत्तरार्धात आर्थिक स्थिती सुधारेल. ताणतणाव, दडपणाच्या काळावर मात करता येईल, मात्र आपल्या कुटुंबाचा पाठिंबा तुम्हाला मदत करेल.

**कुंभ** - तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा. कुणी जुना मित्र आज तुमच्याकडून आर्थिक मदत माघू शकतो आणि जर तुम्ही त्यांची आर्थिक मदत केली तर, तुमची आर्थिक स्थिती थोडी तंग होऊ शकते.

**मीन** - आज तुम्हाला जादुई असे आशादायी वातावरण अनुभवास येईल. दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक केलीत तर तुम्हाला भरघोस नफा होईल. भरपूर आनंदाचा दिवस, जेव्हा तुमचा जोडीदार तुम्हाला खुश करण्याचा प्रयत्न करेल.

## थोडक्यात

### आमदार दिलीप लांडे यांनी चांदिवलीतील नवरात्रउत्सव मंडळांचा उत्साह वाढवला

**घाटकोपर (यश सावंत)** - मुंबई या उत्सव नगरीत सतत उत्सवाची जत्रा असते एका मागोमाग एक उत्सव आणि सन साजरे होत असतात नुकतेच गणपती बाप्पाला मुंबईकरांनी निरोप दिला असून आता अंब्बा मातेचे जलोष्यात आगमन होणार असून नवरात्रौत्सव मंडळाचा जोश वाढला आहे. चांदिवली विधानसभा क्षेत्रामध्ये शिवसेना आमदार दिलीप लांडे यांनी नवरात्री उत्सवासाठी विभागातील मंडळाना आमंत्रीत करून उत्सवाच्या तयारीची माहिती आमदार दिलीप लांडे स्वतः घेत आहेत. नवरात्रउत्सव मंडळाच्या समस्या सोडून हा नवरात्रीचा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा व्हावा यासाठी सहकार्य केले जात आहे. या दरम्यान चांदिवली विधानसभा क्षेत्रातील विविध नवरात्र उत्सव मंडळाची भेट घेऊन लांडे मामा त्यांना हा चांगल्या प्रकारे उत्सव साजरा करण्याच्या शुभेच्छा देत आहेत.

### ज्येष्ठ कलाकार लक्ष्मण श्रेष्ठ यांना वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार जाहीर

मुंबई : दृश्यकलेच्या क्षेत्रात योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलाकारांना राज्य शासनाकडून कै. वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सन २०२२-२३ या वर्षातील कै. वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ कलाकार लक्ष्मण श्रेष्ठ यांना जाहीर देण्यात येणार असल्याची घोषणा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.

या पुरस्कारासाठी गठीत केलेल्या शोध समितीची बैठक मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात झाली. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कला संचालक राजीव मिश्रा, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# ‘कोरेगाव भीमा’ प्रकरणी गोष्टी वदविण्याचा प्रयत्न, कोणत्या राजकीय नेत्याने केला हा आरोप !

**पुणे (अभिजित येरल्लू):** ‘कोरेगाव भीमा दंगल प्रकरणाच्या न्यायालयीन चौकशीत काही लोक माझ्याकडून वेगळ्या गोष्टी वदवून घेण्याचा प्रयत्न करत होते,’ असा आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोमवारी केला. निसर्ग मंगल कार्यालयात बहुजन मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय महासचिव ॲड. राहुल मखरे यांच्यासह त्यांच्या काहींनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पवार बोलत होते.

ते म्हणाले, ‘कोरेगाव भीमाच्या संघर्षामध्ये काही जातिवादी प्रवृत्तींनी वेगळी भूमिका घेतली होती. या प्रकरणामुळे संपूर्ण देशात अस्वस्थता निर्माण झाली होती.



राज्य सरकारने या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याची भूमिका घेतली. न्यायालयीन चौकशी सुरू झाली आणि एके दिवशी मला नोटीस आली. मला नोटीस यासाठी आली, की तुम्हाला समन्स काढले आहे. तुम्ही आयोगाच्या समोर हजर राहा. आयोग म्हणजे एका प्रकारचे न्यायालयच असते. या नोटिशीप्रमाणे मी चौकशीसाठी हजर राहिलो. या वेळी काही वकिलांनी माझी उलट तपासणी घेतली. त्यामध्ये मला अनेक प्रश्न विचारले गेले. माझी उलट तपासणी घेणाऱ्यांमध्ये फुले-आंबेडकर विचारांचे ॲड. राहुल मखरे हेदेखील होते. या प्रकरणात काही लोक माझ्याकडून काही वेगळ्या गोष्टी वदवून घेण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र, वस्तुस्थिती मला माहीत होती. निरपराध लोकांवर हल्ले झाले. जो स्तंभ, त्याचा इतिहास, ज्यासाठी वेगवेगळ्या जातीच्या-धर्माच्या लोकांनी त्याग केला, प्राणांची आहुती दिली, हा इतिहास पुसण्याचे काम काही जातीय प्रवृत्ती करत होते. त्याच्याविरोधात आवाज उठविण्याचे काम आंबेडकरी विचारांच्या काही तरुणांनी करून वस्तुस्थिती, सत्य बाहेर आणले, त्यामध्ये मखरे हे होते.’ ‘जातीयवादी शक्तींच्या विरोधात लढा द्यायचा असेल, तर आपल्याला छत्रपती शिवाजी महाराज, शाहू- फुले-आंबेडकरांचे विचार घेऊन पुढे जावे लागेल. सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र घ्यावे लागेल,’ असेही पवार यांनी स्पष्ट केले.

## फुले दाम्पत्याच्या स्मारकातील शिलालेखात त्रुटी, ओळींमधून ‘शुद्र’ गायब

**नाशिक (सचिन कदम ) :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शहरातील अनावरण झालेले महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे अर्धाकृती कांस्य पुतळे असलेले स्मारक वादात सापडले आहे. स्मारकातील एका शिलालेखात महात्मा फुले यांच्या पुस्तकातील ओळी उदधृत केल्या असून मूळ ओळींमधील ‘शुद्र’ उल्लेख असलेली ओळ वगळण्यासह अन्य काही चुका घडल्याचे उघड झाले आहे. यावरून नव्या वादाला तोंड फुटताच महापालिकेने युद्धपातळीवर शिलालेखात दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.

अन्न, नागरी पुरवठामंत्री तथा ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या



संकल्पनेतून मुंबईनाका येथील सावित्रीबाई फुले चौकात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्यात आले आहे. स्मारकातील पुतळ्यांचे अनावरण शनिवारी मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि भुजबळ यांच्या उपस्थितीत झाले. फुले दाम्पत्याचे देशातील सर्वात मोठे पुतळे या स्मारकात असल्याचे भुजबळ यांच्याकडून सांगण्यात आले होते. महात्मा फुले यांचा पुतळा १८ फूट तर सावित्रीबाई फुले यांचा पुतळा १६.५० फूट आहे. सुमारे पावणेपाच कोटी रुपये खर्चून उभारलेल्या स्मारकात महात्मा फुले यांच्या ‘शेतकऱ्यांचा आसूड’ या पुस्तकातील ओळींचा उल्लेख असलेला शिलालेख आहे.

फुले यांनी ‘विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले” असे म्हटले होते. परंतु, शिलालेखात ‘विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले,’ असा उल्लेख आहे. शिलालेखात ‘वित्ताविना शुद्र खचले’ ही ओळ गायब आहे.

## राणा प्रतापनगरचे पदपथ विक्रेत्यांच्या ताब्यात



**नागपूर (नितीन देवळेकर) :** नागपुरात रस्ते रुंद आहेत, पदपथही मोठे आहेत. पण ते फुटकळ विक्रेत्यांच्या ताब्यात आहेत. त्यामुळे त्यावर चालणाऱ्यांना त्याचा उपयोग होत नाही. दक्षिण-पश्चिम नागपुरातील प्रतापनगर भागातील पदपथावर झालेले अतिक्रमण हा ज्येष्ठ नागरिकांसाठी डोकेदुखीचा विषय ठरला आहे. माटे चौक ते प्रतापनगर चौक सिमेंट रोड साठ फुटाचा असताना दोन्ही बाजूचे पदपथ अतिक्रमणाने गिळंकृत केले आहे . महापालिका व पोलिस प्रशासनाच्या आशीर्वादाने अतिक्रमण करणाऱ्या विक्रेत्यांचे फावले आहे.

गेल्या १५ वर्षा पासून या मार्गा वरील पदपथावर फळ विक्रेते, भाजी विक्रेते व खाद्य पदार्थ विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे. फुलविक्रेते रस्ते मालकीचे असल्यागत वागत आहे.

### चिंचभवनमध्ये विळखा

वर्धा मार्गावरील चिचभवन थांब्या नजिकच्या रस्त्यावर फुटकळ विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे. तेथे रस्त्याच्या बाजूला मोकळी जागा लोकांना अवागमनासाठी आहे. त्यावर खाद्यपदार्थ विक्रेते, भाजी, फळ विक्रेत्यांनी ताबा घेतला आहे. येथे हॉटेल आहे. तेथे येणाऱ्या ग्राहकांचे वाहने रस्त्यावरच उभी केली जातात. मुख्य रस्त्यालगतच्या रस्त्यावर शाळेची वाहने विरूद्ध दिशेने येतात त्यामुळे अनेकदा अपघात होतात. वाहन कोंडी नित्याची झाली आहे. चार सहा महिन्यांत एकदा अतिक्रमण पथक येते, पण नंतर पुन्हा जैसे थे स्थिती होते.

## पालघर जिल्ह्यात दुसरे मोठे बंदर

**पालघर (सुचिता देशमुख):** प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्पानंतर पालघर जिल्ह्यात मुरबेच्या रूपाने दुसरा मोठा बंदर प्रकल्प उभारण्यात येणार आहे. वाढवण बंदरापासून १५ ते २० किमी अंतरावर मुरबे व नांदगाव या गावांदरम्यान खडकाळ क्षेत्रालगत हे बंदर उभारण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. बंदर उभारणीनंतर या ठिकाणी मध्यम व लहान आकाराच्या जहाजांना नांगरणे शक्य होणार आहे. जिंदाल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीने उच्छेळी व सातपाटी खाडीदरम्यान मुरबे समुद्र किनाऱ्यासमोरील उथळ खडकाळ क्षेत्रात भराव टाकून बंदर उभारण्याचे प्रस्तावित केले होते. त्यानुसार मुरबे येथील प्रस्तावित बंदर हे सातपाटी खाडीच्या लगत राहणार आहे. या प्रकल्पाच्या प्रस्तावाला महाराष्ट्र सागरी



मंडळाने ३१ ऑक्टोबर २०२३ बैठकीमध्ये मान्यता दिली होती. सर्व प्रकारच्या मालाची आयात, निर्यात करण्याची २५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमता असणाऱ्या या प्रकल्पासाठी ४२५९ कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे. हे बंदर सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर उभारण्याचे प्रस्तावित असून आराखडा तयार करणे (डिझाइन), उभारणे (बिल्ड), मालकी (ओन), चालविणे (ऑपरेट) व हस्तांतर( ट्रान्सफर) (डीबीओओटी) तत्त्वावर उभारणी होऊन या संदर्भातील स्विस आव्हान पद्धतीची निविदा २१ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. प्राधिकरणाने महिनाभराच्या कालावधीत स्पर्धात्मक निविदा आमंत्रित केल्या असून इच्छुक प्रकल्प प्रवर्तक यांनी बंदर उभारणीच्या दृष्टिकोनातून संकल्पनात्मक योजना तयार करण्यासोबत बंदर क्षेत्र नौकानयन मार्ग व संबंधित सुविधा विकसित करणे, ब्रेक वॉटर बंधारा उभारणे तसेच सुरक्षितपणे व पर्यावरणीय दक्षता घेऊन बंदरामध्ये मालाची हाताळणी करण्याचे आराखडा तयार करणे अपेक्षित आहे.

सातपाटी या मासेमारी बंदरालगत नव्याने मुरबे येथील प्रस्तावित बंदर हे सातपाटी खाडीच्या लगत राहणार असल्यामुळे केळवा, माहीम, सातपाटी, मुरबा, नवापूर, उच्छेळी दांडी येथील मच्छीमारांना झळ पोचण्याची तसेच सातपाटी येथील नैसर्गिक बंदरावर या बंदराचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### नवीन धोरणानुसार प्रस्ताव

जेएसडब्ल्यू कंपनीने सन २०१५ मध्ये नांदगाव-आलेवाडी दरम्यान बंदर उभारणीचे प्रस्तावित केले होते. याला स्थानिक मच्छीमारांनी विरोध केला होता. बंदराविषयीचे प्रकरण उच्च न्यायालयात सुनावणीसाठी असताना जुलै २०२३ मध्ये कंपनीने आपण बंदर या ठिकाणी उभारणार नसण्याचे हमीपत्र दिले. राज्य शासनाने ऑगस्ट २०२३ मध्ये नवीन सागरी धोरणाच्या अनुषंगाने जेएसडब्ल्यूने ऑगस्ट महिन्यात नव्याने प्रस्ताव सादर केला. त्यात मुरबे समुद्र किनाऱ्यासमोरील उथळ खडकाळ क्षेत्रात भराव टाकून बंदर उभारण्याचे प्रस्तावित केले. त्यानुसार हे बंदर सातपाटी खाडीलगत उभारण्यास येणार आहे.

## भोसरी एमआयडीसीत कचऱ्याचे साम्राज्य

**पिंपरी-चिंचवड (शकिल शेख)** - महापालिकेच्या ‘क’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीत येत असलेला भोसरी एमआयडीसी परिसर ३५०० एकर एवढ्या मोठ्या क्षेत्रफळामध्ये सन १९६२ पासून विस्तारलेला आहे. या परिसरामध्ये ४८०० प्लॉटधारक असून बहुउद्देशीय कंपन्यांना सुटे भाग पुरविणारे चार हजारहून अधिक लघुउद्योग आहेत. महापालिका अस्तित्वात आल्यापासून एमआयडीसी आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्या अंतर्गत वादात कायमच एमआयडीसी परिसर हा दुर्लक्षित राहिल्याचा उद्योजकांचा आरोप आहे. उद्योजकांच्या मूलभूत समस्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून या समस्यांबाबत अद्याप ठोस तोडगा निघालेला नाही.



एमआयडीसी परिसरात २२ ब्लॉक असून या परिसरातील कचरा संकलनासाठी केवळ एकच कचरागाडी विभागून देण्यात आली होती. महापालिकेने कचरा संकलनाचे काम खासगी संस्थेला दिले. याबाबतची निविदा प्रक्रिया राबविताना केवळ रहिवासी भागातील कचरा संकलनाचे नियोजन केले. परंतु, औद्योगिक भागाचा समावेश केला नाही. त्यासाठी कर्मचारी नियुक्त केले नाहीत. परिसरातील कचराकुंड्याही उचलण्यात आल्या. कचरा संकलन करणाऱ्या घंटा गाड्याही बंद केल्या. परिणामी, एमआयडीसीमध्ये प्रत्येक ठिकाणी कचऱ्याचे ढीग झालेले आढळून येतात. कचरा साचल्याने कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. कामगारांना डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारखे रोग झाले आहेत.

## Nashik court summons Rahul Gandhi in defamation case over Savarkar remarks



**Nashik :** A magistrate court in Maharashtra's Nashik recently issued a summons to Congress MP Rahul Gandhi in a defamation case over his alleged remarks on Hindutva ideologue V D Savarkar.

"Having considered the submissions made before me and considering the record, it appears that the statements made by the accused against patriotic person prima-facie seem to be defamatory. There are sufficient grounds to proceed in the case," the order passed by an additional chief judicial magistrate in Nashik on September 27 said. The complainant in the case claimed that he had watched Gandhi's press conference and speech in 2022 in which he made remarks on Savarkar, alleging that they were defamatory in nature.The complainant submitted to the court that Gandhi had said that "Savarkar is BJP and RSS Jin" and that "with a folding hand Savarkar prayed for release and later on promise to work for the British Government". The complainant claimed that these were statements which were aimed at creating a loss of reputation and defaming Savarkar. The complaint sought action under sections of the Indian Penal Code pertaining todefamation and intentional insult.

# Osho followers in Pune deny UK woman's rape charges: 'baseless and have no truth whatsoever'

**Pune :** After a British woman alleged she was raped over 50 times in Osho ashrams across the world in the 1970s, the controversial guru's close associates denied the charges on Tuesday and said children were not allowed inside the ashram located in upscale Koregaon Park area of Pune city. In an interview with The Times, the UK-based newspaper, the 54-year-old woman has alleged she was forced to engage in sexual activities from the age of seven after her mother was drawn to the cult. The woman also alleged that between the age of 7 and 11, she and her friends were coerced into performing sexual acts on adult men living in the ashram before these escalated to rape. A documentary, Children of the Cult, made by Maroesja Perizonius is also based on the woman's allegations against the Osho ashrams. "If these allegations also pertain to the ashram in Pune of the 70s, then they seem to have been made with an intention to make money…They are baseless and have no truth whatsoever so far as Pune's Osho ashram of the 70s is concerned…This is because children were never allowed inside the ashram except for once during lunch break," Swami Chaitanya Keerti, a close associate of Osho who joined the ashram in 1974 and was with him for at least 15 years, told The Indian Express. Swami Chaitanya Keerti — who has been ousted from Osho International Meditation Resort, a new name given to the Osho ashram, and now heads the 'Rebel Sannyansins' group — also served as the editor of Osho Times. Ma Amrit Sadhana, spokesperson for Osho International Meditation Resort, said, "The 21 members who run the Resort have collectively decided not to respond to the allegations as the Resort has nothing to do with them". Keerti said children were not allowed to stay at the Pune ashram so the question of their sexual exploitation cannot arise. "Only parents could come inside the ashram and participate in the meditation and commune activities whole day, and children could come during lunch hour only," he added.



## SIT probe into Tirupati Laddus 'adulteration' temporarily stalled: Andhra DGP



**New Delhi :** The Special Investigation Team (SIT) probe into 'adulteration' of Tirupati Laddus has been temporarily stalled as the case is under Supreme Court's purview, PTI quoted Andhra Pradesh DGP as saying on Tuesday. "First they (SIT) have to understand the process, study it and take all the information, but in the meantime, an order has come from the Supreme Court and in line with that, we have stopped it (probe)," Andhra top cop Dwaraka Tirumala Rao said in a statement according to PTI. On Monday, the SIT inspected the flour mill in Tirumala where the ghee is stored and tested in the lab before being used to prepare Laddus. On Monday, the Supreme Court while observing that gods should be kept away from politics, questioned Andhra chief minister Chandrababu Naidu's public statement alleging that animal fat was used in making Laddus under previous Jagan Mohan Reddy government. "It is very clear from the report that this is not the Ghee which has been used. Unless you are sure, how did you go to public with that?" a bench of Justices B R Gavai and K V Viswanathan said.

# जिल्हा बँकेच्या सोहळ्याला शेतकऱ्यांऐवजी कार्यकर्त्यांची साताऱ्यात जमणार गर्दी....

● सातारा, (सचिन कदम) :

पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र व शेतकऱ्यांऐवजी काही संचालकांची श्रीमंत बँक असे सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सहकार क्षेत्रात वर्णन केले जाते. ती सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अमृत महोत्सव सांगता सोहळा बुधवार दिनांक २ ऑक्टोबर रोजी दुपारी बारा वाजता सातारा सैनिक स्कूल मैदानावर होत आहे.

या कार्यक्रमाला शेतकऱ्यांऐवजी महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांची गर्दी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे हा अमृत महोत्सव बँकेच्या सांगता सोहळयासाठी सातारा जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुकांच्या गर्दी होणार की सामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळणार?



असा प्रश्न सर्वसामान्य शेतकऱ्यांना पडलेला आहे. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेने भारताच्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट२०२३ ते १५ ऑगस्ट २०२४ या काळात सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकने गौरवशाली अमृत महोत्सवी वर्ष साजरे केले. या निमित्ताने अमृत महोत्सव सांगता सोहळा बुधवार दिनांक २ ऑक्टोबर रोजी दुपारी बारा वाजता सैनिक स्कूल मैदान, सातारा येथे आयोजित केला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अर्थमंत्री अजितदादा पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील ,उत्पादन शुल्क मंत्री व पालकमंत्री शंभूराज देसाई तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अध्यक्ष विद्याधर अनास्कर ,आमदार -, बँकेचे सर्व संचालक यांना प्रमुख उपस्थिती व पाहुणे म्हणून निमंत्रित केले आहे.

या कार्यक्रमासाठी बँकेचे शेतकरी सभासद ,माजी संचालक, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन, सचिव, अधिकारी, सेवक, ठेवेदार,, कर्जदार या सर्वांना निमंत्रण पत्रिका खास दूतामार्फत पाठवण्यात आले आहेत. राज्यात महायुतीच्या घटक पक्षातील मान्यवर कार्यकर्त्यांनाही खास बाब म्हणून निमंत्रण देण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाचे नेटके नियोजन करण्यासाठी बँकेचे अध्यक्ष व खा.नितीनकाका पाटील व उपाध्यक्ष अनिल देसाई तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र सरकाळे यांच्यासह बँकेचे संचालक व वरिष्ठ अधिकारी- कर्मचारी वर्ग परिश्रम घेत आहेत.

आगामी विधानसभेच्या निवडणुकीत सातारा जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी व महायुतीच्या माध्यमातून उमेदवाराची चाचणी सुरू झालेली आहे. अशा वेळेला पक्षाचे प्रमुख मान्यवरांचे साताऱ्यात जिल्हा बँकेच्या कार्यक्रमासाठी आगमन होत आहे. यानिमित्त अनेक इच्छुकांमध्ये चांगली स्पर्धा लागलेली आहे. विशेष बाब म्हणजे सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदासाठी जिल्ह्यातील आमदार सुद्धा खूप इच्छुक असतात. आता याच संचालकांमधील काही जण आमदारकीसाठी इच्छुक आहेत . त्यामध्ये बँकेचे संचालक असलेले सत्यजित पाटणकर, शेखर गोरे, माजी आमदार प्रभाकर घाडगे व माजी संचालक इच्छुक असून त्यांनी प्रचाराच्या दोन फेऱ्या पूर्ण केलेले आहेत. या कार्यक्रमानिमित्त उपस्थित असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना व भाजपचे नेते कोणती भूमिका घेतात? याकडे लक्ष लागलेले आहे. या मोठ्या कार्यक्रमानंतर आचारसंहिता लागणार असल्यामुळे नेते व इच्छुकांमध्ये काय चर्चा होते यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहे असल्याचे बोलले जात आहे.

# पंतप्रधानांची सभा झालीच नाही

## पण मैदानाची झाली दुर्दशा !

● पुणे, (शकिल शेख) :



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेसाठी स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर मोठा मंडप उभारण्यात आला होता. पावसामुळे तो कार्यक्रम होऊ शकला नाही. मात्र मंडप उभारणीच्या कामामुळे महाविद्यालयाच्या मैदानाची दुर्दशा झाल्याचे स्पष्ट झाले असून, खेळांचा सराव करायचा कसा, असा प्रश्न खेळाडू विद्यार्थ्यांसमोर निर्माण झाला आहे. पुणे मेट्रोच्या जिल्हा न्यायालय-स्वारगेट या मार्गाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २६ सप्टेंबर रोजी करण्यात येणार होते. मेट्रोच्या उद्घाटनासह विविध विकासकामांचे उद्घाटनही याच कार्यक्रमात करण्याचे नियोजन होते. या पार्श्वभूमीवर, स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर पंतप्रधानांची सभा होणार होती.

# पर्यटनाचा पहिलाच दिवस अन् वाघ...



● नागपूर, (नितीन देवळेकर ) :

ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प वगळता राज्यातील अभयारण्य व व्याघ्रप्रकल्पांच्या गंभीर अधिवासातील(कोर) पर्यटनाचे दरवाजे मंगळवार, एक ऑक्टोबरपासून खुले झाले आहे.ताडोबा व्याघ्रप्रकल्पातील दरवाजे मात्र एक दिवस उशिरा म्हणजे बुधवार, दोन ऑक्टोबरपासून उघडणार आहेत.राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार देशभरातील अभयारण्य आणि व्याघ्रप्रकल्पाच्या गंभीर अधिवासातील पर्यटन पावसाळयात तीन महिने बंद ठेवण्यात येते. काही अभयारण्य आणि व्याघ्रप्रकल्पांमध्ये मात्र बफर क्षेत्रातील पर्यटन प्राधिकरणाच्या परवानगीने पावसाळयात देखील सुरू ठेवण्यात येतात. गेल्या काही वर्षात गंभीर अधिवासापेक्षाही बफर क्षेत्रात वाघांची संख्या वाढली आहे. व्याघ्रदर्शन देखील सहज होत असल्याने पर्यटकांचा ओढा या क्षेत्राकडे वाढला आहे. प्रामुख्याने ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पात गंभीर अधिवासापेक्षाही बफर क्षेत्रातील वाघांनी पर्यटकांना आकर्षित केले आहे.

# खान्देश कुंभार समाज मंडळाचा वार्षिक स्नेह मेळावा संपन्न

● कल्याण, (आकाश कांबळे) :



खान्देश कुंभार समाज मंडळ कल्याणच्या वतीने वार्षिक स्नेह मेळावा व विद्यार्थी गुणगौरव सोहळा रविवारी संध्याकाळी सिद्धिविनायक हॉल भोईर वाडी कल्याण येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सतीश दरेकर, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शासकीय कामकाज व स्पर्धा परीक्षा शरद वाडेकर हे उपस्थित होते. भगवान सूर्यवंशी व रघुनाथ कुंभार, रंगराव मोरे, मंडळाचे अध्यक्ष रमेश मोरे,सचिव भगवान कुंभार, आनंद कुंभार, भालेराव, राम पाहणेरकर, भास्कर कल्याणकर, अमोल केमबुंलकर, डॉ.काळे इ.कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेशचे मान्यवर मंचावर उपस्थित होते. समाजातील विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. विशेष सन्मान म्हणून पोलीस उप निरीक्षक म्हणून नियुक्ती झालेले देवानंद चव्हाण यांचा शाल, सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन निता मोरे, कल्पना बोरसे, नरेंद्र मोरे, विलास मोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लक्ष्मण पगारे, संजीव सोनवणे, अनिरुद्ध चव्हाण, चेतन मोरे, प्रकाश बोरसे, जगदीश मोरे, मधुकर कुंभार, अर्जुन बोरसे, प्रकाश बोरसे, नारायण महाले, राजाराम बच्छाव, कैलास बच्छाव, विकास मोरे, योगेश मोरे, विजय मोरे, विलास महाले, आत्माराम सोनवणे व समस्त कुंभार समाज मंडळ कल्याणच्या सभासदांनी सहकार्य केले.

# मुंबई, ठाणेकरांना टोलचा आणखी भुर्दंड

## वित्त विभागाच्या आक्षेपानंतर ४० हजार कोटींच्या प्रकल्पांना मंजुरी

● मुंबई, (विशाल कारंडे ) :



हजारो कोटी रुपये खर्चाच्या नव्या योजना आणि निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा ताण पडत आहे. राजकोषीय तूट दोन लाख कोटींच्या घरात पोहोचली आहे. अशातच कर्जाचा भारही वाढत असून हजारो कोटी रुपये खर्चाच्या नव्या प्रकल्पांसाठी निधी कुठून उभारणार. तिजोरीवरील भार कसा कमी करणार अशा वित्त विभागाच्या आक्षेपानंतर मुंबईतील ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह तसेच ठाणे-बोरिवली दरम्यानच्या भुयारी मार्गावर पथकर लावून प्रकल्पाचा खर्च वसूल करण्याच्या हमीनंतरच मंत्रिमंडळ बैठकीत या दोन्ही प्रकल्पांना सोमवारी मान्यता देण्यात आली. यावेळी ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या सुधारित आराखड्यास मान्यता देताना प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाल्यास त्याचा सर्व भार ठाणे पालिकेवर टाकण्यात आला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सुमारे ४० हजार कोटी रुपये खर्चाच्या तीन पायाभूत सुविधा प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह या भुयारी मार्गाच्या कामाला गती देण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास (एमएमआरडीए) बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. सुमारे ९१५८ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प असून, राज्य शासनाच्या करासाठी ६१४ कोटी ४४ लाख रुपये, केंद्राच्या कराच्या पन्नास टक्के रकमेसाठी ३०७ कोटी २२ लाख रुपये, भूसंपादनासाठी ४३३ कोटी असे एकूण एक हजार ३५४ कोटी ६६ लाख रुपये बिनव्याजी दुय्यम कर्ज म्हणून उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. यावेळी ठाणे ते बोरिवली दरम्यानच्या ११.८५ किलोमीटर लांबीच्या आणि सहा पदरी अशा सुमारे १८ हजार ८०० कोटी ४० लाख रुपये खर्चाच्या भुयारी मार्ग प्रकल्पास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे १२ हजार २२० कोटी रुपये खर्चाच्या ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या सुधारित आराखड्यासही यावेळी मान्यता देण्यात आली.

# अतिश म्हात्रे यांना राज्यस्तरीय आदर्श साहित्यरत्न पुरस्कार प्रदान



● अलिबाग, (दिगंबर जाधव) :

साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन आगरसुरे-अलिबाग चे अतिश अशोक म्हात्रे यांची यंदाच्या आदर्श साहित्यरत्न पुरस्कारासाठी माणिकराव पाटील एज्युकेशनल फाउंडेशन, कोल्हापुरतर्फे निवड करण्यात आली होती. राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट कोल्हापूर येथे शनिवार दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित कार्यक्रमात. शिवाजी विद्यापीठाचे डॉ. बी. एम. हिर्डेकर यांची प्रमुख उपस्थिती होती व तसेच पुरोगामी शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. लेखक अतिश म्हात्रे यांनी अनेक लेख, कथा, तसेच "जन्मांतर एक रहस्य" ही कादंबरी लिहिली आहे.

# जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्यांचे लेखणी बंद



● नागपूर, (नितीन देवळेकर) :

शासनाच्या जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियांत्रिकी सेवेतील अभियंत्यांचे पदोन्नतीसह इतरही अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. शासनाला निवेदन दिल्यावर आश्वासनाशिवाय काहीच मिळत नाही. शेवटी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राजपत्रित अभियंता संघटनेकडून मंगळवारी राज्यभरात लेखणी बंद आंदोलन सुरू झाले आहे. आंदोलनामुळे दोन्ही विभागातील कामे विस्कळीत झाली आहे.

नागपुरात सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंते मंगळवारी (१ ऑक्टोंबर) सकाळी सिव्हिल लाईन्स परिसरातील बांधकाम संकुलात राजपत्रित अभियंता संघटनेच्या नेतृत्वात एकत्र आले. सगळ्यांनी यावेळी शासनासह प्रशासनाच्या अभियंता विरोधी धोरणाचा निषेध केला. त्यानंतर नागपुरातील सिंचन भवन परिसरातही दुपारी निदर्शने करण्यात आली. सिव्हिल लाईन्स परिसरात आंदोलक म्हणाले, तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या कार्यकाळात अभियांत्रिकी सेवा नियमांच्या पुनर्रचनेच्या विषयावर संघटनेशी चर्चा झाली. त्यावेळी सेवा नियमांची संरचना तयार करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ अभियंत्यांची समिती गठित झाली. समितीने अहवाल दिला. हा अहवाल सामान्य प्रशासन विभागाच्या ९ सप्टेंबर २०२१ रोजीच्या मार्गदर्शक तत्त्व प्रणालीनुसार आहे. परंतु हा अहवाल प्रशासनाने कोणतेही कारण न सांगता बाजूला ठेवला. अभियांत्रिकी सेवेच्या सर्वच संवर्गांना हानी पोहचवणारा निर्णय घेण्यात आला. त्याविरुद्ध राजपत्रित अभियंता संघटनेने, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे आक्षेप नोंदवला. त्यांनी अहवालाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अभ्यास करण्याच्या सूचना दिल्या. परंतु काहीच होत नसल्याने शेवटी आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान शासनाने आताही अभियंत्यांच्या मागण्या मान्य न केल्यास येत्या काळात आणखी तिव्र आंदोलन करण्याचा इशारा राजपत्रित अभियंता संघटनेचे सल्लागार सुभाष चांदसुरे, अध्यक्ष मिलिंद पाटणकर, कार्याध्यक्ष अविनाश गुल्हाने यांनी दिला.

# शिर्डी साईबाबा संस्थान वीजनिर्मितीत होणार स्वयंपूर्ण; वर्षाला तब्बल २० कोटींची होणार बचत

● अहमदनगर, ( दिगंबर जाधव):

शिर्डीत साई मंदिरासह भक्तनिवास, प्रसादालय, साईबाबा हॉस्पिटल, शैक्षणिक संकुल अशा विविध इमारतींची निर्मिती करण्यात आली असून, वर्षाकाठी तब्बल २० कोटींचा खर्च साईबाबा संस्थानाला वीज बिलासाठी येतो. आता साईबाबा संस्थान वीज निर्मितीत स्वयंपूर्ण होणार असून, पर्यावरणपूरक अशा सोलर आणि पवनचक्कीच्या माध्यमातून आठ मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. त्यामुळे साईबाबा संस्थानच्या तब्बल २० कोटी रुपयांची वर्षाला बचत होणार असून, विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणार साईबाबा



संस्थान कदाचित राज्यातील हे पहिलं तीर्थक्षेत्र ठरण्याची शक्यता आहे. देश-विदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून साईबाबांकडे पाहिलं जातं. देशातील दुसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत देवस्थान अशीसुद्धा शिर्डीतल्या साई मंदिराची ख्याती आहे. साईबाबा संस्थानाअंतर्गत साई मंदिर, मंदिर परिसर, विविध भक्तनिवास, हॉस्पिटल आणि प्रसादालय अशा विविध इमारती येतात. या सर्व ठिकाणी लागणारी वीज ही महावितरणाकडूनच घेतली जाते. मात्र, काही वर्षांपूर्वी साईबाबा संस्थानामार्फत पारनेर तालुक्यातील सुपा येथे दोन पवनचक्की प्रकल्प उभारण्यात आला. तर त्यानंतर प्रसादालयाची इमारत पूर्णतः सोलरवर आधारित करण्यात आलीये. साई आश्रम भक्त निवासावरदेखील सोलर पॅनल बसवण्यात आलेय. स्वयंपूर्ण होणार: साई संस्थानला आठ मेगावॅट विजेची गरज आहे. मात्र सद्यस्थितीत चार मेगावॅट निर्मिती ही पवनचक्की आणि रूफटॉप सोलरमधून केली जाते. तर इतर ठिकाणी लागणारी वीज ही महावितरणाकडून घेतली जाते, यासाठी वर्षाकाठी तब्बल २० कोटींचा खर्च साईबाबा संस्थानला येतो. मात्र, काही दिवसांपूर्वीच झालेल्या महावितरण आणि साईबाबा संस्थानच्या बैठकीत साईबाबा संस्थान पूर्णतः स्वयंपूर्ण करण्यासाठी निर्णय घेण्यात आलाय. या अनुषंगाने पवनचक्कीची क्षमता वाढवणे, भक्तनिवास आणि रुग्णालयाच्या इमारतीवर सोलर युनिट बसवून वीजनिर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या आठवडाभरात नवीन दर्शन रांगेवर सोलर युनिट बसवण्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. यातून साईबाबा संस्थानची तब्बल २० कोटी रुपयांची वर्षाकाठी बचत होणार आहे. विजेच्या बाबतीत आठ मेगावॅट वीज निर्मिती करून साईबाबा संस्थान हे तीर्थक्षेत्र स्वयंपूर्ण होणार राज्यातील पहिले देवस्थान ठरेल, यात शंकाच नाही.

# जिल्हा क्रीडा संकुलाचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते भूमिपूजन

## आंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्कृष्ट खेळाडू घडविण्यासाठी जिल्हा क्रीडा संकुल मुख्य भूमिका बजावेल -पालकमंत्री रवींद्र चव्हाण



● पालघर, (सतीश सोनावणे) :

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्कृष्ट खेळाडू घडविण्यासाठी राज्य शासनाचे जिल्हा क्रीडा संकुल मुख्य भूमिका बजावेल असा विश्वास सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला. पालघर जिल्हा क्रीडा संकुलाचे भूमिपूजन टेंभोडे येथे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. त्यावेळी श्री. चव्हाण बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, माजी खासदार राजेंद्र गावित, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने तसेच खेळाडू आणि विद्यार्थी उपस्थित होते.

खेळाला विशेष प्राधान्य देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन विशेष प्रयत्न करत असून खेलो इंडियाच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्राला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पालघर जिल्ह्यातील तरुणांना क्रीडा क्षेत्राचे विशेष आकर्षण असल्यामुळे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी जिल्ह्यामध्ये क्रीडा संकुल व्हावे अशी मागणी केली होती. त्यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून क्रीडा संकुलाचे आज भूमिपूजन करण्यात आले आहे. विविध क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. खेळाडूंना विविध सुविधा पुरवण्यासाठी क्रीडा क्षेत्रामध्ये उद्योजक, नागरिक तसेच स्वयंसेवी संस्था यांनी योगदान दयावे. असे अवाहनही पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी केले.